**CNR No :- MHSI100003092018**

## –: नियमित दिवाणी मुकदमा क्र. ३८/२०१८ :–

## –: निशाणी क्र. १०७ वरील आदेश :–

वादी क्र. ७ याने प्रस्तुतचा अर्ज दाव्यात व दावा नोंदवहीमध्ये दुरुस्ती करण्याची परवानगी मिळण्यासाठी केलेला आहे.

०२. प्रस्तुत अर्जात वादी क्र. ७ ने असे कथन केले आहे की, सदरहू दावा हा वादी यांनी हक्कप्रस्थापनेसाठी, सरस निरस धडेवाटप होवून मिळण्यासाठी व कायमच्या ताकीदीसाठी दाखल केलेला असून सदर दाव्यातील प्रतिवादी नं. १ महादेव लक्ष्मण ठाकूर हे दिनांक ३०.०८.२०२५ रोजी मयत झालेले आहेत. सदरहू मयत प्रतिवादी नं. १ यांना खालीलप्रमाणे कायदेशिर व जवळचे वारस आहेत :–

प्रतिवादी नं. १ महादेव लक्ष्मण ठाकूर मयत वारस

| | | | |
|---|---|---|---|
| १अ) | श्रीमती पार्वती महादेव ठाकूर,<br>वय सु. ८० वर्षे, धंदा– गृहिणी, | – | मयताची पत्नी |
| १ब) | श्री. आनंद महादेव ठाकूर,<br>वय सु. ५२ वर्षे, धंदा शेती, | – | मयताचा मुलगा |
| १क) | सौ. अनुजा आनंद सावंत<br>पुर्वाश्रमीची शोभा महादेव ठाकूर,<br>वय सु.५८ वर्षे, धंदा गृहिणी, | – | मयताची मुलगी |
| १ड) | सौ. समिधा लक्ष्मण गवस,<br>पुर्वाश्रमीची उषा महादेव ठाकूर,<br>वय सु.५५ वर्षे, धंदा– गृहिणी,<br>सर्व रा. थोरले भराड, साटेली–भेडशी,<br>ता. दोडामार्ग, जि. सिंधुदुर्ग ४१६५१२ | – | मयताची मुलगी |

वरील प्रमाणे मयत प्रतिवादी क्र. १) महादेव लक्ष्मण ठाकूर यांना जवळचे व कायदेशिर वारस आहेत. सदरहू दावा हा वादी यांनी हक्कप्रस्थापनेसाठी, सरस निरस धडेवाटप होवून मिळण्यासाठी व कायमच्या ताकीदीसाठी दाखल केलेला असून सदरहू दाव्याचा अंतिम निकाल हा मयत प्रतिवादी नं. १ यांच्या वारसांवर बंधकानकारक असल्याने त्यांना या दाव्याचेकामी पक्षकार करणे आवश्यक आहे. सबब, मयत प्रतिवादी नं. १ च्या वर नमूद वारसांना या दाव्याच्या कामी मयत प्रतिवादी नं. १ चे वारस म्हणून प्रतिवादी सदरात प्रतिवादी नं. १अ ते १ड म्हणून सामील करुन तशी मूळ दाव्याच्या नि.क्र.१ वर दुरुस्ती करण्यास परवानगी मिळणेसाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

०३. प्रतिवादींचे प्रस्तुत अर्जाकामी म्हणणे मागविण्यात आले. प्रतिवादी क्र.१४ यांनी म्हणणे दाखल करुन सदरचा अर्ज खर्चासह नामंजूर करण्याची विनंती केली आहे. प्रतिवादी क्र. १ चे विधिज्ञांनी न्यायहितार्थ योग्य ते आदेश पारीत करण्याची विनंती केली आहे.

०४. अर्ज व म्हणण्याचे अवलोकन केले. विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

०५. दाव्याचे स्वरुप पाहता वादी क्र. ७ मागत असलेली दुरुस्ती दावा गुणदोषावर निकाली करणेकरीता महत्वाची असल्याचे दिसून येते. वादीने सदरचा अर्ज हा प्रतिवादी क्र. १ मयत झाल्यानंतर त्यांचे वारसांना अभिलेखासदरी घेण्याबाबत दाखल केल्याचे दिसुन येते. वादीने सदरची दुरुस्ती ही विहीत मुदतीत

मागितल्याचे दिसुन येते. वादी मागत असलेल्या दुरुस्तीमुळे दावा परीणामकारकरीत्या निकाली करण्यास न्यायालयास मदतच होणार आहे. या सर्व कारणास्तव वादी क्र. ७ हा नि.क्र.१०७ वरील अर्ज मंजुर होऊन मिळणेस पात्र आहे. सबब खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

**–:: आदेश ::–**

१. न्यायाचे कारणे नि.क्र.१०७ वरील अर्ज मंजूर करणेत येत आहे.

२. वादीने सदर आदेशाच्या दिनांकापासून १४ दिवसांच्या आत कसुरीशिवाय अर्जातील मागणी प्रमाणे दाव्यात दुरुस्ती केल्यावर तशी दावा दुरुस्त प्रत हजर करावयाची आहे.

३. विहीत मुदतीत आदेशाची पुर्तता न केल्यास सदरचा आदेश स्वयंचलनाने (automatically) रद्द झाला असे समजण्यात यावे.




Digitally signed by YASHODHAN PRADEEP BAVKAR
Date: 2026.03.11 15:45:10 +0530

ठिकाण – दोडामार्ग.
दिनांक – ११.०३.२०२६.

(वाय. पी. बांवकर)
दिवाणी न्यायाधीश (क. स्तर)
दोडामार्ग.